शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

# सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद यवतमाळ

## उपक्रम व योजनांची माहिती

## सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, यवतमाळ

**पार्श्वभूमी :-**

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाचे उदिष्टय पूर्ण करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान हा उपक्रम सन 2001 पासून राबविण्यात येत आहे. 6 ते 14 वर्षे वयोगटातील सर्व मुला-मुलींना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची जबाबदारी या उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009 ची प्रभावी अंमलबजावणी सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. प्रत्येक बालक शिक्षणाच्या प्रवाहात आणणे व त्याची 100 टक्के टिकवणूक करण्याचे काम अभियानातून करण्यात येते.

**सर्व शिक्षा अभियानाची उदिष्टये :-**

1) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे व शिक्षण हक्क कायदयाची अंमलबजावणी करणे.
2) 6 ते 14 वयोगटातील 100 टक्के विद्यार्थ्यांची पटनोंदणी करणे.
3) विद्यार्थ्यांची टिकवणूक करणे.
4) विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे.
5) 6 ते 14 वयोगटातील शाळाबाहय बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे.
6) शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 ची यशस्वी अंमलबजावणी करणे.

7) शिक्षणात लोकसहभाग वाढविणे.

8) शाळाबाहय मुलांना शाळेत प्रवेशित करुन घेणे.

9) समावेशित शिक्षणाच्या माध्यमातून (वयोगट 1 ते 18) दिव्यांगाना सोयी-सुविधा पुरविणे व विशेष शिक्षण देणे.

10) सर्व शाळांमध्ये बांधकामे (इमारत, वर्गखोली, रॅम्प, किचनशेड, स्वच्छतागृह, संरक्षक भिंत,हॅन्डवॉश स्टेशन इ.) पुर्ण करणे.

## सर्व शिक्षा अभियान अंतर्गत योजनांची माहिती -

1) **विशेष प्रशिक्षण** -

I) **योजनेची माहिती -**

- जे विद्यार्थी शाळेमध्ये सतत गैरहजर असतात व जे विद्यार्थी शाळेमध्ये कधीही दाखल झालेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करुन घेणे.
- शाळाबाहय विद्यार्थ्यांसाठी शालेय वेळेतच विशेष प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे
- सदर उपक्रमाकरीता आवश्यक निधी शाळास्तरावर वितरीत करणे
- पर्यवेक्षकीय यंत्रणेबाबत उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करुन घेणे
- महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई यांचेकडून वेळोवेळी प्राप्त निर्देशाप्रमाणे कार्यवाही करणे.

II) **योग्यता-** 6 ते 14 वयोगटातील सर्व माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनाच्या मान्यता प्राप्त शाळांमधील दाखल शाळाबाहय विद्यार्थी

2) **हंगामी वस्तीगृह -**

i) **योजनेची माहिती -**

- पालकांच्या हंगामी स्थलांतरामुळे मुलांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होऊ नये याकरीता हंगामी वस्तीगृहाची स्थापना करणे
- पालकांच्या स्थलांतरनामुळे स्थलांतरीत होणाऱ्या विद्यार्थ्यांचा गावनिहाय सर्वे करणे.
- सदर वसतिगृहाची 6 महिन्याच्या कालावधी करीता स्थापना करणे
- महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचेकडे स्थलांतरीत होणाऱ्या संभाव्य विद्यार्थ्यांची यादी सादर करणे.
- महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचे निर्देशाप्रमाणे सदर योजनेकरीता निधी वितरीत करणे.
- पर्यवेक्षकीय यंत्रणेमार्फत हंगामी वसतिगृहाची दरमहा तपासणी करणे
- हंगामी वसतिगृहाचा अहवाल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचेकडे सादर करणे.

ii) **योग्यता-**6 ते 14 वयोगटातील जिल्हा परिषद शाळेमधील ज्या विद्यार्थ्यांचे पालक रोजगारासाठी अन्य ठिकाणी स्थलांतरीत होतात अशा 20 पेक्षा जास्त स्थलांतरीत पालकांच्या पाल्याकरीता अनिवासी हंगामी वस्तीगृह सुरू करण्यात येते .

iii) **कागदपत्रांची यादी-** कुटूंब सर्वेक्षण, संभाव्य स्थलांतरीत पालकांच्या पाल्याची यादी शाळा व्यवस्थापन समितीचा ठराव

3) **मोफत पाठयपुस्तके-**

i) **योजनेची माहिती -**

- सर्व शिक्षा अभियान अंतर्गत जिल्हयातील इयत्ता 1 ली ते 8 वी च्या जि.प.,न.प.,शासकीय शाळा व खाजगी अनुदानित शाळेतील पात्र लाभार्थ्यांची U-DISE वरून सांख्यिकीय माहिती महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचेकडे सादर करणे.
- लाभार्थी विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके व स्वाध्यायपुस्तिका शाळेच्या पहिल्या दिवशी समारंभपूर्वक वितरीत करणे.
- पर्यवेक्षकीय यंत्रणेमार्फत योजनेचा आढावा घेणे व अहवाल सादर करणे

II) **योग्यता-जिल्हयातील** इयत्ता 1 ली ते 8 वी च्या जि.प.,न.प.,शासकीय शाळा व खाजगी अनुदानित शाळेतील सर्व विद्यार्थी

4) **गणवेश सुविधा-**

I) **योजनेची माहिती -**

- सर्व शिक्षा अभियान अंतर्गत जिल्हयातील इयत्ता 1 ली ते 8 वी च्या जि.प.,न.प.,शासकीय शाळेतील गणवेशासाठी पात्र लाभार्थ्यांची U-DISE वरून सांख्यिकीय माहिती महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचेकडे सादर करणे. विद्यार्थ्यांची गणवेशाची मापे घेण्यासाठी शाळास्तरावर कळविणे
- सर्व शिक्षा अभियान अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना प्रत्येकी गणवेश रू.200/- प्रमाणे 2 गणवेश शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून वितरीत करणे.

II) **योग्यता-जिल्हयातील** इयत्ता 1 ली ते 8 वी च्या जि.प.,न.प.,शासकीय शाळांमधील सर्व मुली, अनु.जमाती मुले,अनु.जाती मुले आणि दारिद्रयरेषे खालील मुले .

5) **बांधकाम -**

I) **योजनेची माहिती -**

- सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शाळांना U-DISE नुसार भौतिक सुविधा उपलब्ध करुन देणे.
- U-DISE मागणीनूसार शाळांचे बांधकामांचे प्रस्ताव राज्यस्तरावर सादर करणे.
- महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचेकडून मंजूर झालेल्या बांधकामांना प्रशासकीय मान्यता देणे व कार्यकारी अभियंता यांचेकडून तांत्रिक मान्यता घेऊन प्राप्त निधी शाळास्तरावर वितरीत करणे.
- शाळा व्यवस्थापन समिती यांचे मार्फत बांधकामे पूर्ण करुन घेणे.
- कनिष्ठ अभियंता यांचे माध्यमातून बांधकामांच्या गुणवत्तेविषयी मार्गदर्शन करणे व बांधकाम विहित कालावधीत पूर्ण करुन घेणे.
- सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शालेय इमारती, वर्गखोली, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, स्वयंपाकगृह, शाळा विद्युतीकरण, संरक्षक भिंत, पिण्याचे पाणी व दिव्यांग मुलांसाठी रॅम्प, शाळेची मोठी दुरुस्ती, हँन्डवॉश स्टेशन इत्यादी बांधकामे विहीत कालावतधीत शाळा व्यवस्थापन समिती मार्फत पूर्ण करुन घेणे.

II) **योग्यता-जिल्हयातील** इयत्ता 1 ली ते 8 वी च्या जि.प.व न.प. शाळा

iii) **आवश्यक कागदपत्रे -** जागेचा नमुना -8 अ, शाळा व्यवस्थापन समिती ठराव व करारनामा,ग्रा.पं.चे नाहरकत प्रमाणपत्र ,उपलब्ध असलेल्या जागेचा नकाशा

6) **अपंग समावेशित शिक्षण -**

i) **योजनेची माहिती -**

- लाभार्थी 6 ते 18 वयोगटातील विशेष गरजा (अपंग) असणारे विद्यार्थी

(अपंगाचे प्रकार- 1) अस्थिव्यंग 2) मतिमंद 3) कर्णबधीर 4) अंध 5) अंशत: अंध 6) सेरेब्रल पाल्सी 7) वाचादोष 8) बहुविकलांग 9) स्वमग्न )

- दिव्यांगांना सर्व सामान्य विदयार्थ्याबरोबर समावेशित शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे.
- शाळेमध्ये भौतिक सहाय्यभूत सुविधा पुरविणे- रॅम्पस, हॅंड्रील्स, कमोड टॉयलेट
- शैक्षणिक सुविधा- संसाधन कक्षाची निर्मिती तालुकास्तर, केंद्रस्तर
- समावेशित विशेष शिक्षण तज्ञ व विशेष शिक्षकांव्दारे विशेष गरजा असणाऱ्या विदयार्थ्यांना अध्ययन-अध्यापन
- लाभार्थी विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य, साधने पुरविणे, वैद्यकिय सेवासुविधा पुरविणे, (व्हिलचेअर ट्रायसिकल,क्रचेस,ब्रेलस्लेट,ब्रेलकेन,श्रवणयंत्र
  रोलेटर,कमोडचेअर ,कॅलीपर ,ब्रेलपाठयपुस्तके,लार्जप्रिंट पुस्तके)

- विशेष मार्गदर्शन शिक्षक, पालक, समाज ,लोकप्रतिनिधी यांना समुपदेशन.
- फिजिओथेरेपीस्ट व सायकालॉजीस्ट यांच्या माध्यमातून CWSN च्या विद्यार्थ्यांना सेवा पुरविल्या जातात.
- जिल्हास्तरावरुन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ व जिल्हा कार्यालय सर्व शिक्षा अभियान मार्फत समावेशित शिक्षण उपक्रमाची अंमलबजावणी करणे.

ii) **योग्यता-** जिल्हयातील सर्व लाभार्थी 6 ते 18 वयोगटातील विशेष गरजा (दिव्यांग) असणारे विद्यार्थी

दिव्यांगाचा प्रकार- 1) अस्थिव्यंग 2) मतिमंद 3) कर्णबधीर 4) अंध 5) अंशत: अंध 6) सेरेब्रल पाल्सी 7) वाचादोष 8) बहुविकलांग 9) स्वमग्न

**7)दुर्बल व वंचित गटातील बालकांना खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये 25 टक्के मोफत प्रवेश-**

i) **योजनेची माहिती -**

- शिक्षण हक्क अधिनियम 2009 मधील कलम -12 (1) सी नुसार जिल्हयातील खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये दुर्बल व वंचित गटातील बालकांना इयत्ता 1ली मध्ये किंवा शाळेत पुर्व प्राथमिक शिक्षणाची सुविधा असल्यास नर्सरी मध्ये 25 टक्के जागा राखीव ठेवून मोफत प्रवेश देण्यात येतो.

- सन 2016-17 पासून 25 टक्के मोफत प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येते यामध्ये जिल्हयातील सर्व खाजगी विनाअनुदानित शाळा दिलेल्या संकेत स्थळावर शाळेची नोंदणी करून गुगल मॅपिंगवर आपल्या शाळेचे नाव, राखीव जागांची संख्या इतर अनुषंगीक माहिती भरतात.
- शाळा नोंदणी नंतर पालक दिलेल्या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज भरून त्यात त्यांचे रहिवास ,बालकाचे वय,बालकाचा प्रवर्ग,पालकाचे उत्पन्न यासंबधी माहिती भरून गुगल मॅपिंगवर त्यांच्या घराचे स्थान निश्चित करतात.
- पालकांनी ऑनलाईन भरलेल्या फॉर्म मधून संकेतस्थळावर पालक समक्ष स्वयंचलित यादृच्छीक ऑनलाईन सोडत काढण्यात येते.निवड झालेले विद्यार्थी त्यांना मिळालेल्या शाळेत प्रवेश घेतात.प्रवेश घेतलेल्या बालकांना इयत्ता 8 वी पर्यत मोफत शिक्षण देण्यात येते.
- 25 टक्के अंतर्गत मोफत प्रवेश दिलेल्या शाळांना शासनाकडून शैक्षणिक शुल्काची प्रतीपूर्ती करण्यात

II) **योग्यता-**

- जिल्हयातील सर्व माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनाच्या खाजगी विनाअनुदानित शाळा
- दुर्बल घटक- एक लाखापेक्षा कमी उत्पन्नाचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखल असलेल्या इतर मागास वर्ग , विशेष मागास प्रवर्ग, भटक्या व विमुक्त जाती ,धार्मिक अल्पसंख्यांकासह इतर सर्व पालकाचा पाल्य
- वंचित घटक-अनु.जाती, अनु.जमाती व दिव्यांग बालके

iii) **आवश्यक कागदपत्रे -**

वंचित घटक - अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच अपंग बालके

- **आवश्यक दस्ताऐवज- 1) जातीचा दाखला:-** पालकांचा उपविभागीय अधिकाऱ्याचा जातीचा दाखला.
- 2)रहिवासाचा **/निवासाचा पुरावा :-** आधारकार्ड/पासपोर्ट/निवडणूकओळखपत्र/विद्युतबिल,/पाणी बिल,/घरपटटी/टेलीफोन बिल,ड्रायव्हींग लायसन्स या पैकी एक आवश्यक.
- 3) **बालकाचा जन्मतारखेचा दाखला/पुरावा :-**
- ग्रामपंचायत, नगरपरिषद , रूग्णालय, अंगणवाडी, बालवाडी रजिष्टर मधिल दाखला, पालकाचे प्रतिज्ञा पत्र या पैकी एक आवश्यक.
- 4)अपंगत्वाचा **पुरावा :-**
- अपंग बालकासाठी 40% किंवा त्या पेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम अधिका-यांचे प्रमानपत्र.
- **5)बालकाचा पासपोर्ट फोटो** .

**दुर्बल घटक - रु.1 लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागासवर्गीय व धार्मीक अल्पसंख्यांकासह इतर बालके.**

- **आवश्यक दस्ताऐवज-** 1) उत्पन्नाचा दाखला :- तहसिलदाराचा / नायब तहसीलदाराचा उत्पन्नाचा दाखला
- 2) रहिवासाचा /निवासाचा पुरावा :- आधारकार्ड/पासपोर्ट/निवडणूकओळखपत्र/विद्युतबिल,/पाणी बिल,/घरपटटी/टेलीफोन बिल,ड्रायव्हींग लायसन्स या पैकी एक आवश्यक.
- 3) बालकाचा जन्मतारखेचा दाखला/पुरावा :- ग्रामपंचायत, नगरपरिषद , रूग्णालय, अंगणवाडी, बालवाडी रजिष्टर मधिल दाखला, पालकाचे प्रतिज्ञा पत्र या पैकी एक

आवश्यक.

- 4) बालकाचा पासपोर्ट फोटो .

IV) **भरावयाचा अर्जाचा नमुना** -प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन असल्यामुळे अर्जाचा नमुना संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
इतर अनुषंगिक माहिती-संकेत स्थळाचा पत्ता-http://rte25admission.maharashtra.gov.in/

**8)शिक्षक प्रशिक्षण-**

**I) योजनेची माहिती -**

- शिक्षकांना अद्ययावत प्रशिक्षण देणे.
- जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षकांना विविध विषयांतर्गत प्रशिक्षित करणे.
- महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मंुंबई यांचे मार्गदर्शक सूचनेप्रमाणे प्रशिक्षणाचा निधी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे वर्ग करणे.
- जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडून प्रशिक्षणाचा अहवाल घेऊन राज्यस्तरावर सादर करणे.

**9) लोकजागृती -**

**I) योजनेची माहिती -**

- शाळा सुरु होण्याच्या पहिल्याच दिवशी शिक्षण पालखीचे आयोजन करणे
- शिक्षणाचा अधिकार अधिनियम कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रचार व प्रसार करणे.
- 15 ऑगस्ट व 26 जानेवारी या दिवशी शैक्षणिक चित्ररथाचे आयोजन करणे
- पत्रकार परिषद आयोजित करणे
- शिक्षणाची वारी हा उपक्रम आयोजित करणे
- पर्यवेक्षकीय यंत्रणेमार्फत उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करुन घेणे

**10) शाळा व्यवस्थापन समिती प्रशिक्षण -**

**I) योजनेची माहिती -**

- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधियिम 2009 अंतर्गत शिक्षण प्रक्रियेमध्ये लोकसहभाग वाढविणे
- शाळा व्यवस्थापन समितीच्या सक्षमीकरणासाठी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व लोकप्रतिाधिींचे प्रशिक्षण आायोजित करणे.
- महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचेकडून प्राप्त प्रशिक्षणाचे साहित्य व सुचना शाळास्तरावर वितरीत करणे.

11) **नवोपक्रम-**

**I) योजनेची माहिती -**

- नवोपक्रम या उपक्रमांतर्गत संगणक शिक्षण,अल्पसंख्यांक विद्यार्थ्यासाठी उपक्रम, ग्रंथालय तसेच मुलांमध्ये सांघिक भावना वाढी करीता मिना राजु मंच, उपक्रमशिल शाळांकरीता निधी इत्यादि उपक्रम महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचे मार्गदर्शक सूचनेप्रमाणे शाळा स्तरावर राबविले जातात.

## 12) U-DISE

**I) योजनेची माहिती -**

- U-DISE च्या माध्यमातून 30 सप्टेंबर ही दिनांक गृहीत धरुन सर्व शाळांची विद्यार्थी,शिक्षक,भौतिक सुविधा व इतर सर्व प्रकारची अद्यावत माहिती संकलित केल्या जाते.
- U-DISE चा वापर शैक्षणिक धोरण ठरवितांना तसेच वार्षिक कार्ययोजना अंदाजपत्रक तयार करतांना केला जातो.
- U-DISE मधील माहितीचा उपयोग शासकीय धोरणांची, योजनांची अंमलबजावणी करण्याकरीता केल्या जातो.

********